# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## उपसंचालक कार्यालय, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक

## भरती प्रक्रिया

## जाहीरात क्र.०२/२० जिल्हा – जळगाव

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नाशिक परिमंडळांतर्गत येणाऱ्या जळगाव या जिल्हयासाठी रिक्त असलेल्या पदांच्या पदभरती प्रक्रियेसाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करार पदध्तीने मानधन तत्वावर खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून ई-मेलद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**RESERVATION CHART OF VACANT POST NHM 2020-21 RECRUITMENT**

| SR. NO. | POST NAME | EDUCATIONAL QUALIFICATION | SALARY PER MONTH | RESERVATIONS | | | | | | | | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | SC | ST | VJ | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN | |
| 1 | Specialist - Psychaiatrist | MD Medicine / DPM / DNB | 75000 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 2 | Specialist - Pediatrician | MD Medicine / DCH / DNB | 75000 | 3 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 3 |
| 3 | MO Male UG (RBSK ) | BAMS | 28000 | - | 3 | - | 1 | 2 | 1 | 1 | - | 2 | 2 | 4 | 16 |
| 4 | MO UG (RBSK MO Female) | BAMS | 28000 | 1 | - | - | - | 1 | - | 1 | - | 2 | 1 | 7 | 13 |
| 5 | Accountant | B.Com with Tally Certification | 17000 | - | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 |
| 6 | Psychiatric Nurse | GNM / B.Sc with certification in Psychiatry from reputed institute OR DPN OR M.Sc Nursing (Psy) | 25000 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 7 | Block Community Mobilizer | Any graduate with Typing skill, Marathi - 30 words per minute , English 40 words per minute with MSCIT with 1 Year Experience | 17000 | - | - | 1 | - | - | - | - | - | - | - | | 1 |
| 8 | MO - Full Time (NUHM) | MBBS | 45,000 | - | 1 | 1 | - | - | - | - | 1 | 1 | 1 | 1 | 6 |
| | **TOTAL** | | | 4 | 5 | 2 | 1 | 3 | 1 | 2 | 1 | 5 | 4 | 14 | 42 |

**Dy. Director,**
**Health Services**
**Nashik Circle, Nashik**

**अटी व शर्ती:-**

१) इच्छुक उमेदवारांनी दि.२२/०५/२०२० ते दि.२५/०५/२०२० रोजी रात्री १२:०० वाजेपर्यंत या कालावधीपर्यंत ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयाच्या सोबत दिलेल्या ई- मेल आयडीवर सोबत दिलेला विहीत नमुन्यातील अर्ज व जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक शैक्षणिक अर्हताचे कागदपत्रे एकाच पिडीएफ फाईलमध्ये सादर करावीत. मुदतीनंतर ई - मेलद्वारे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्ज पोष्टाद्वारे, कुरियर अथपा प्रत्यक्षात (By Hand) स्विकारण्यात येणार नाही.

२) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

३) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील. वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.), विशेषतज्ञ, अतिविशेषज्ञ यांची कमाल वयोमर्यादा ७० वर्ष राहील. इतर रुग्ण सेवेशी संबंधित पदांसाठी (उदा.परिचारिका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माता, इ.) कमाल वयोमर्यादा ६५ वर्ष राहील व इतर सर्व पदांसाठी वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष व राखीव प्रवर्ग ४३ वर्षे राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडुन शारीरीक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

४) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन, त्यांचा कालावधी अकरा महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत. अथवा त्या आधी मंजुरी न मिळाल्यास पदे कधीही समाप्त करण्यात येतील.

५) ई- मेल द्वारे प्राप्त झालेल्या अर्जावरुन Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुणावरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. सदर मेरीटलिस्ट शासनाच्या **www.nrhm.maharashtra.gov.in** व **https://arogya.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी सदरबाबत आक्षेप असल्यास त्याच दिवशी आपले आक्षेप नोंदवावे. तद्नंतर प्राप्त आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी. विहीत मुदतीत प्राप्त आक्षेपांचा विचार करुन अंतिम मेरीटलिस्ट उपरोक्त शासकीय संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

७) केंद्र / राज्य शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

९) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा. जर मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधुन सादर केलेला असेल, परंतु सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१०) **राखीव संवर्गातुन अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्या संवर्गाचे जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभही घेता येणार नाही.**

**Dy. Director,**
**Health Services**
**Nashik Circle, Nashik**

११) सहसंचालक ( अतांत्रिक) रा.आ.अ. मुंबई यांचे क्र. राआसो/ मनुष्यबळ/ आरक्षण /२४५६४-७७४/१६ दि. २०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

१२) **स्टाफ नर्स, औषधनिर्माता, वैद्यकीय अधिकारी, विशेषज्ञ इत्यादी पदाकरीता तत्सम कौन्सिलकडील वैध नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.**

१३) कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. तथापी वैदय प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१४) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१५) **निवड झालेल्या उमेदवारांना ज्या जिल्हयासाठी अर्ज केलेला आहे त्या जिल्हयातील रिक्त असणाऱ्या आरोग्य संस्थेत नियुक्ती देण्यात येईल. उमेदवारांना तेथे रुजु होणे बंधनकारक राहील.**

१६) मुलाखत होणार नसल्याने तसेच अर्ज ई-मेल द्वारेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवू नये.

१७) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१८) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१९) अर्जाचा नमुना हा जाहिरातीसोबत प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास , उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

२०) उमेदवारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने तसेच आवश्यकतेनुसार कागदपत्रे जोडले नसल्यास नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

२१) विहीत नमुन्यातील अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदविका शेवटच्या वर्षाची प्रमाणपत्र (टिपः सर्व वर्षांचे प्रमाणपत्र सादर करु नये) ३) गुणपत्रिका ४) कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable) ५) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे पी.डी.एफ. स्वरुपात सादर करावी.

२२) उपरोक्त कागदपत्रे पी.डी.एफ. स्वरुपात प्राप्त होत असल्याने, ती स्पष्टपणे दिसतील याची काळजी घ्यावी. तसेच सदर प्राप्त अर्जावरुन मेरीट लिस्ट तयार होणार असल्याने, नियुक्ती नंतर कामावर रुजु होतांना आपण सादर केलेली माहिती आपल्या मुळ कागदपत्रांशी पडताळली जाणार असल्याने, त्यात काही अनियमितता आढळल्यास आपले नियुक्त आदेश रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२३) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

२४) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

२५) उपरोक्त आवश्यक कागदपत्रांसह विहीत नमुन्यातील अर्ज खालील ई-मेल आडीवर पाठविण्यात यावा.

Dy. Director,
Health Services
Nashik Circle, Nashik

| ई-मेल आयडी |
| --- |
| jalgaon1nrhmddhsnsk@gmail.com |
| **टीप :- ई-मेल पाठवितांना सदर ई-मेलचा विषय (Subject) खालीलप्रमाणे नोंदवावे**<br>**Subject :- < Name of post Applied > -- < Full Name of Candidate >**<br>**उदाहरण:- 1) Subject :- Staff Nurse -- SHRI/SMT. X. Y. ZZZ**<br>**2) Subject :- Physician -- DR. P. Q. RRR**<br>**तद्नंतर उर्वरित सर्व कागदपत्रे जाहिरातीत दिल्यानुसार UPLOAD करावे** |

२६) ऑनलाईन जाहीरातीसोबत दिलेला अर्जाचा नमुना डाऊन लोड करुन प्रिंट काढुन सादर करावा. सदर अर्जाची पी.डी.एफ. फाईल तयार करुन उपरोक्त दस्ताऐवजांसह जिल्हानिहाय जाहीरातीत दिलेल्या उपरोक्त ई-मेल आयडीवर पाठवावी.

२७) **स्वतःच्या ई-मेल आयडीवरुनच अर्ज करण्यात यावा अन्यथा सदर अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. तसेच कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी पीडीफ स्वरुपात ई-मेलद्वारे सादर करतेवेळी त्याची साईज कमी (जास्तीत जास्त १० ते १५ एमबी) असणे आवश्यक आहे. सादर करण्यात येणाऱ्या फाईलची साईज ही मोठी असल्याने ती या कार्यालयास न मिळाल्यास तसेच गुगल ड्राइव्हद्वारे पाठविल्यास सदर अर्ज अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

२८) भरती प्रक्रियेच संपुर्ण अधिकारी, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे निवड प्रकियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार, इत्यादी प्रकारचे सर्व अधिकार हे मा. उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक परिमंडळ, नाशिक यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**(डॉ.एम.आर.पट्टणशेट्टी)**
**उपसंचालक, आरोग्य सेवा**
**नाशिक मंडळ, नाशिक**

# Deputy Director Health Services
# Nashik Circle, Nashik
# National Health Mission Recruitment 2020-21
# Application Form
## Applying District Name- ..................................
## Post Name- ..................................

Paste photo

(All fields in the forms are mandatory to be filled an Incomplete form submitted will be treated as rejected)

| | | |
|---|---|---|
| Name: | | |
| Father's/Husband's Name: | | |
| Date of Birth(DD/MM/YYYY) | Blood Group: | Gender: |
| Marital status : | *Existing NHM Employee (Yes/ No)* | Nationality: |
| Original Category : | Applying for Category: | Caste Certificate Attached : **Yes/No** |

Address/Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)

| | |
|---|---|
| Address(Present):<br><br>State<br><br>Pin:<br><br>Contact No: | Address (permanent):(Write same if same as Present Address)<br>State<br><br>Pin:<br><br>Contact No: |
| E-Mail Id Correspondence: | |

| | |
|---|---|
| Computer Proficiency: | English Typing 40 W.pm (Yes/No):<br>Marathi Typing 30 W.pm (Yes/No): |

Academic /Professional Educational all summary: (Starting form most recent)

| From (MM/YY | TO (MM/YY) | Degree/Diploma | University/Institute | Specialization/ Subjects | Final Year Total Marks & Obtained Marks | Final Year Percentage ( %) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

Permanent Work Council Registration No: (As Applicable) (MO/SN/Pharmacist,etc) :-

Work/Experience Summary :( Starting form current/most recent)

Experience in NHM (Experience of BVG will not be counted)

| Sr. No | Form (MM/YY) | To (MM/YY | Organization | Designation | Responsibilities (Min.30 & Max.50 Words) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| Total Experience (In Years & Months): | | | | Relevant Experience to the post applied (In Years & Months): | |

Declaration:

I hereby declare that all statements made in the application are true, Complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.

Name:

Place:

Date

Signature

Disclaimer:

**Checklist for documents (PDF) to be submitted through E-mail**

1) Full filled Application form in the prescribed format.
2) For MO/SN/Pharmacist Valid registration certificate.(As Applicable) If not renewed, renewal receipt.
3) For age Proof – School Leaving Certificate/ 10th or 12 th Passing Certificate
4) **Diploma, Degree & Master Degree – Only submit Last Year Certificate and Marksheet**
5) If any post-graduation, Post-graduation certificate
6) Experience – Experience certificate as per mention in the form
7) Computer Proficiency - MS- CIT/ DOEACC Course- for the Post of Data entry oprator if applicable.